| वर्ष - 9 | अंक - 150 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज™



पान 3 वरुन...

भाजपामधून NCP मध्ये गेले अन् सपाटून आपटले!

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 23 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मातृशक्तीच्या नेतृत्वात महापालिका भ्रष्टाचार मुक्त करु-भाजपाचा नारा

# मुंबईच्या महापौरपदी कोण होणार विराजमान?



। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

महाराष्ट्रातल्या २९ महानगरपालिकांमध्ये नुकत्याच निवडणुका पार पडल्या आहेत. या निवडणुकांमध्ये भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी काही महानगरपालिकांमध्ये भाजपाला सहाकारी पक्ष किंवा प्रसंगी विरोधी पक्षातील काही गटांचा पाठिंबा घेण्याची तजवीज करावी लागली. तर दुसरीकडे राज्यात सत्तेत एकत्र असणाऱ्या



पक्षांना स्थानिक पातळीवर आपल्याच मित्रपक्षाविरोधात उभं राहण्याचा निर्णय घेण्याचे सर्वाधिकार स्थानिक नेत्यांवर देण्याची वेळ ओढवली. या पार्श्वभूमीवर एकीकडे सत्तास्थापनेबाबत जवळपास सर्वच महानगरपालिकांमध्ये राजकीय नाट्य रंगत असताना दुसरीकडे महापौरपदाची सोडत हादेखील चर्चेचा विषय ठरला होता. ही सोडत अखेर जाहीर झाली आहे.

## मातृशक्तीच्या नेतृत्वात महापालिका भ्रष्टाचार मुक्त करु

मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी खुला प्रवर्ग आणि महिला महापौर असा निकष ठरला आहे. त्यामुळे मुंबईच्या महापौरपदी महिलाच विराजमान होणार हे स्पष्ट झालं आहे. मातृशक्तीच्या नेतृत्वात मुंबई महापालिका भ्रष्टाचारमुक्त करु अशी प्रतिक्रिया भाजपाचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी दिली आहे. दरम्यान मुंबईच्या महापौरपदासाठी कुठल्या नगरसेविकांची नावं चर्चेत आहेत हे आपण जाणून घेऊ.

## महापौर पदाचा चेहरा म्हणून कुठल्या ५ नावांची चर्चा?

१) तेजस्वी अभिषेक घोसाळकर : तेजस्वी घोसाळकर यांनी निवडणुकीच्या तोंडावर शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाला जय महाराष्ट्र करत भाजपात प्रवेश केला. १६ हजार ४८४ मतं मिळवत त्यांनी विजय मिळवला. त्यामुळे त्यांना मुंबईचं महापौरपद दिलं जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२) योगीता सुनील कोळी : योगीता सुनील कोळी यांनी मालाडमधून विजय मिळवला आहे. त्यांनीही मोठं मार्जिन ठेवून हा विजय मिळवला आहे. त्यामुळेच त्यांचंही नाव महापौर पदाच्या शर्यतीत असण्याची शक्यता आहे.

३) आशा मराठे : भाजपाच्या आशा मराठे या तिसऱ्यांदा नगरसेविका झाल्या आहेत. त्यामुळे महापौर पदाची माळ त्यांच्या गळ्यात पडणार का? याचीही चर्चा रंगली आहे.

४) अलका केळकर या भाजपाच्या ज्येष्ठ नेत्या आहेत. त्यांनी मुंबईच्या उपमहापौर म्हणूनही काम केलं आहे. तसंच त्या चौथ्यांदा नगरसेविका झाल्या आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे महापौर पद जाऊ शकतं अशीही एक चर्चा आहे.



५) या यादीतलं पाचवं नाव आहे रितू तावडे. रितू तावडे यांच्याकडे भाजपाच्या महिला मोर्चाचं पद आहे. तसंच त्या दुसऱ्यांदा निवडून आल्या आहेत. त्यामुळे भाजपा त्यांना मोठी जबाबदारी देणार का? हे पाहणंही महत्त्वाचं असेल.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ही ५ नावं चर्चेत आहेत. पण भाजपा त्यांच्या धक्कातंत्रासाठी प्रसिद्ध आहे. त्यामुळे यांच्यापैकीच कुणी नगरसेविका महापौर होईल असं मुळीच नाही. मुंबईच्या महापौरपदी खुल्या प्रवर्गातील महिला महापौर होईल हे नक्की झालं आहे. पण तो चेहरा कुणाचा असेल? हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. येत्या दोन ते तीन दिवसांत याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे.

# पुणे ग्रँड टूर २०२६ : ल्यूक मडग्वेचे वर्चस्व कायम

## आमदार भीमराव तापकीर, मनपा आयुक्त नवलकिशोर राम यांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**पुण्यात आयोजित ऐतिहासिक 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेने दुसऱ्या दिवशी अधिकच थरारक वळण घेतले. 'मराठा हेरिटेज सर्किट' या दुसऱ्या टप्प्यात चीनच्या 'ली निंग स्टार' संघाचा सायकलपटू ल्यूक मडग्वे याने सलग दुसरा विजय मिळवत 'यलो जर्सी'वरील आपले वर्चस्व कायम राखले.**






या वेळी आमदार भीमराव तापकीर आणि पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवलकिशोर राम आदी मान्यवरांच्या हस्ते यशस्वी सायकलपटूंचा गौरव करण्यात आला.

आजचा दुसरा टप्पा 'मराठा हेरिटेज सर्किट' अंतर्गत १०५.३ किलोमीटरचा होता. पुण्याच्या कॅम्प परिसरातील लेडीज क्लब येथून दुपारी १२.३० वाजता शर्यतीला प्रारंभ झाला, तर सिंहगड रोडवरील नांदेड सिटी येथे समारोप झाला. डोंगराळ भूभाग, तीव्र चढ-उतार आणि वळणावळणाचे रस्ते यामुळे हा टप्पा सायकलपटूंच्या ताकद, तंत्र आणि सहनशक्तीची कसोटी पाहणारा ठरला.

ल्यूक मडग्वे याने ०२:३१:४९ या वेळेत शर्यत पूर्ण करत प्रथम क्रमांक पटकावला. थायलंडच्या 'रुजाई इन्शुरन्स' संघाचा ॲलन कार्टर बेटल्स दुसऱ्या, तर बेल्जियमचा यॉर्बन लॉरिसेन तिसऱ्या क्रमांकावर राहिला.

दुसऱ्या टप्प्यानंतर विविध श्रेणींतील जर्सी विजेते पुढीलप्रमाणे ठरले आहेत: यलो जर्सी (एकूण आघाडी) : ल्यूक मडग्वे (चीन), पोल्का डॉट जर्सी (किंग ऑफ द माउंटेन्स) : स्टीफन बेनेटन (गुआम), ऑरेंज जर्सी (सर्वोत्कृष्ट आशियाई सायकलपटू) : जंबालजाम्ट्स सेनबायर (मंगोलिया/स्पेन), व्हाईट जर्सी (सर्वोत्कृष्ट युवा सायकलपटू) : तिजसेन विगो (नेदरलँड्स), तर ब्ल्यू जर्सी (भारताचा सर्वोत्तम सायकलपटू) : मनव सरदा (इंडियन डेव्हलपमेंट टीम).

ही स्पर्धा भारतातील सायकलिंग क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरत असून UCI 2.2 श्रेणीतील ही देशातील पहिली पाच दिवसांची मल्टि-स्टेज 'कॉन्टिनेंटल सायकल रेस' आहे. पाच खंडांतील ३५ देशांचे १७१ आंतरराष्ट्रीय दर्जाचे सायकलपटू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. एकूण ४३७ किलोमीटरचा मार्ग पुणे जिल्ह्यातील ९ तालुके आणि १५० गावांतून जात असून, अवघ्या ७५ दिवसांत जागतिक दर्जाच्या या स्पर्धेसाठी रस्ते व पायाभूत सुविधा अद्ययावत करण्यात आल्या आहेत.

विजयानंतर बोलताना ल्यूक मडग्वे म्हणाला, "आजचा दिवस अत्यंत उष्ण होता आणि चढाव खूप आव्हानात्मक होते; मात्र संघातील सहकाऱ्यांच्या उत्तम साथीतून हा विजय मिळवता आला."

स्पर्धेचा तिसरा टप्पा उद्या, २२ जानेवारी २०२६ रोजी 'वेस्टर्न घाट गेटवे' अंतर्गत पुरंदर ते बारामती (१३४ किमी) दरम्यान पार पडणार असून, या टप्प्यात पुणेकरांना जागतिक दर्जाच्या सायकलपटूंच्या वेगवान आणि थरारक कामगिरीचा अनुभव घेता येणार आहे.

# तिकिटांचा गोंधळ, पक्षनिष्ठा वाऱ्यावर; शेवटच्या दिवशी राजकीय धावपळ शिगेला

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी बुधवारी (दि. २१) तिकिटांचा गोंधळ पाहायला मिळाला. एकीकडे युतींमुळे आधीच नाराज झालेल्या इच्छुकांनी पक्षनिष्ठा वाऱ्यावर सोडत उमेदवारी मिळेल त्या पक्षात प्रवेश केला.**

काही ठिकाणी भाजप-शिंदेसेना, घड्याळ-तुतारी आमने-सामने पहायला मिळाली. दरम्यान, सर्वांचे लक्ष लागलेल्या बारामती तालुक्यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपबरोबर युती धर्म पाळण्याचा प्रयत्न केला. परंतु, पदाधिकाऱ्यांना ते न रुचल्याने भाजपकडून काहींना उमेदवारी देण्यात आली आहे. रात्री उशिरापर्यंत अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या गोंधळामुळे कोणाला उमेदवारी मिळाली आणि कोणाचा पत्ता कट झाला याचे चित्र स्पष्ट होऊ शकले नाही.

महापालिका निवडणुकीत आलेले अनुभव लक्षात घेता सर्वच पक्षांनी अधिकृत उमेदवारांना एबी फॉर्म देण्याचे टाळले. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी काही जणांना एबी फॉर्म मिळाले तर काहींना थेट अर्ज दाखल करण्याच्या काही वेळ आधीच




एबी फॉर्म दिले गेल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. शिरुरमध्ये इच्छुक उमेदवार, समर्थक व कार्यकर्त्यांची अचानक झालेली गर्दी, धक्काबुक्की आणि गोंधळामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. काही तालुक्यांमध्ये एबी फॉर्मच्या उशिरा मिळालेल्या निर्णयांमुळे आणि शेवटच्या क्षणी झालेल्या पक्षांतरांमुळे शिरूर तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, येत्या निवडणुकीची खरी लढत आता रंगात आली आहे.

जिल्ह्यात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे मनोमिलन झाले असून आंबेगाव वगळता सर्वच ठिकाणी घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवली जाणार असे बोलले जात होते. मात्र, अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी यामध्ये मोठे बदल पहायला मिळाले. बारामतीमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवार गटाला एकही जागा दिली नाही. याउलट भाजपबरोबर युती धर्म पाळण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. मुळशीतही उमेदवारीवरून घड्याळ-तुतारी आमने-सामने आले आहेत. या ठिकाणी दोन्ही गटांनी इच्छुकांना पक्षाचे एबी फॉर्म दिले.

# भाजपामधून NCP मध्ये गेले अन् सपाटून आपटले!

## भोसरी विधानसभा मतदार संघातील 'केस स्टडी'

## आमदार महेश लांडगे यांच्यावर केलेली टीका भोवली?

। पिंपरी । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**काही ठिकाणी भाजप-शिंदेसेना, घड्याळ-तुतारी आमने-सामने पहायला मिळाली. दरम्यान, सर्वांचे लक्ष लागलेल्या बारामती तालुक्यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपबरोबर युती धर्म पाळण्याचा प्रयत्न केला.**






परंतु, पदाधिकाऱ्यांना ते न रुचल्याने भाजपकडून काहींना उमेदवारी देण्यात आली आहे. रात्री उशिरापर्यंत अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या गोंधळामुळे कोणाला उमेदवारी मिळाली आणि कोणाचा पत्ता कट झाला याचे चित्र स्पष्ट होऊ शकले नाही.

महापालिका निवडणुकीत आलेले अनुभव लक्षात घेता सर्वच पक्षांनी अधिकृत उमेदवारांना एबी फॉर्म देण्याचे टाळले. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी काही जणांना एबी फॉर्म मिळाले तर काहींना थेट अर्ज दाखल करण्याच्या काही वेळ आधीच एबी फॉर्म दिले गेल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. शिरुरमध्ये इच्छुक उमेदवार, समर्थक व कार्यकर्त्यांची अचानक झालेली गर्दी, धक्काबुक्की आणि गोंधळामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. काही तालुक्यांमध्ये एबी फॉर्मच्या उशिरा मिळालेल्या निर्णयांमुळे आणि शेवटच्या क्षणी झालेल्या पक्षांतरांमुळे शिरूर तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, येत्या निवडणुकीची खरी लढत आता रंगात आली आहे.

जिल्ह्यात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे मनोमिलन झाले असून आंबेगाव वगळता सर्वच ठिकाणी घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवली जाणार असे बोलले जात होते. मात्र, अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी यामध्ये मोठे बदल पहायला मिळाले. बारामतीमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवार गटाला एकही जागा दिली नाही. याउलट भाजपबरोबर युती धर्म पाळण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. मुळशीतही उमेदवारीवरून घड्याळ-तुतारी आमने-सामने आले आहेत. या ठिकाणी दोन्ही गटांनी इच्छुकांना पक्षाचे एबी फॉर्म दिले.

पिंपरी-चिंचवड शहराचे नेते म्हणून आता महेश लांडगे यांना लोकमान्यता मिळाली. अत्यंत प्रतिकूल झालेल्या या निवडणुकीत महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडकरांचा स्वाभिमान जागृत केला. प्रतिस्पर्धी राष्ट्रवादीचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महेश लांडगे यांच्यावर थेट टिका केली आणि ही निवडून अजित पवार विरुद्ध महेश लांडगे अशी झाली. महेश लांडगे यांच्या राजकीय कारकीर्दीमध्ये हा 'टर्निंग पॉईंट' ठरला आहे. स्व. आण्णासाहेब मगर, दिवंगत प्रा. रामकृष्ण मोरे, दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्यानंतर आता आमदार महेश लांडगे पिंपरी-चिंचवड शहराचे नेते झाले आहेत. किंबहुना, भारतीय जनता पार्टीच्या शहरातील निर्णय प्रक्रियेमध्ये महेश लांडगे 'डिसिझन मेकर' च्या भूमिकेत दिसणार आहेत. सुमारे 40 वर्षांनंतर आता शहराला स्थानिक नेतृत्त्व प्राप्त झाले आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

# भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटेंचा महापौर पदावर दावा!

। पिंपरी । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर पदासाठीची राजकीय हालचाल पुन्हा एकदा वेग घेत आहे. नुकत्याच पार पडलेल्या आरक्षण सोडतीत महापौर पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुले झाल्याने, आतापर्यंत संधीपासून दूर राहिलेले अनेक नगरसेवक सक्रिय झाले आहेत.**

या पार्श्वभूमीवर भाजपचे शहराध्यक्ष आणि नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी महापौर पदासाठी इच्छुक असल्याचं म्हणत पक्षश्रेष्ठी नक्कीच विचार करेल अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

भाजप संघटनेत दीर्घकाळ कार्यरत असलेले शत्रुघ्न काटे हे पक्षातील निष्ठावंत चेहरा मानले जातात. २०१२ आणि २०१७ या दोन्ही महापालिका निवडणुकांमध्ये ते महापौर पदासाठी इच्छुक होते. विशेषतः २०१७ मध्ये त्यांच्या नावाची महापौरपदासाठी जोरदार चर्चा सुरू होती. मात्र, पक्षातील अंतर्गत राजकारण आणि समीकरणांमुळे ऐनवेळी त्यांची संधी हुकली आणि भोसरी विधानसभा मतदारसंघातील नितीन काळजे यांची महापौरपदी निवड झाली.



२०१७ साली पहिल्यांदाच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेवर भाजपची सत्ता आली होती. त्या ऐतिहासिक सत्तेचे पहिले महापौर होण्याचा मान नितीन काळजे यांना मिळाला. मात्र, या प्रक्रियेत शत्रुघ्न काटे यांना डावलले गेल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. त्यानंतर स्थायी समितीच्या अध्यक्षपदासाठीही त्यांच्या नावाचा विचार झाला; परंतु आजतागायत महापालिकेतील कोणतेही महत्त्वाचे पद त्यांच्या वाट्याला आलेले नाही.

दरम्यान, चिंचवड विधानसभा मतदारसंघात जगताप कुटुंबाला उमेदवारी देण्याच्या मुद्द्यावर उघड विरोध केल्यानंतर शत्रुघ्न काटे यांना शहराध्यक्ष पद मिळाले होते. त्यांनी संघटनात्मक काम सुरू ठेवत पक्षाशी निष्ठा कायम राखली.

२०२६ च्या महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शत्रुघ्न काटे यांच्यावर पुन्हा एकदा महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली. स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप शहराध्यक्ष असताना जशी भाजपला शहरात सत्ता मिळाली होती, त्याच धर्तीवर काटे यांच्या काळातही भाजपची सत्ता टिकून राहिली. या यशात संबंधित आमदार आणि संघटनेचा मोठा वाटा असल्याचे बोलले जाते.

महापौर पदासाठी स्पर्धा तीव्र होण्याची चिन्हे असून, भोसरी विधानसभा मतदारसंघातून बिनविरोध निवडून आलेले रवी लांडगे, माऊली जगताप, जालिंदर शिंदे, शीतल शिंदे यांच्यासह अनेक नगरसेवक इच्छुक असल्याची माहिती आहे.




## भूमिका

**जगभर युद्धाचे ढग दाटले असतानाही क्रूड ऑईलचे दर घसरत असून, याचा फायदा भारताला होत आहे. अमेरिकेचे निर्बंध, रशियन तेलावरील वाढते डिस्काऊंट आणि नव्या पुरवठा स्रोतांमुळे तेल बाजारात नवा समतोल निर्माण झाला आहे. इराणभोवतीची अनिश्चितता भारताच्या ऊर्जा सुरक्षिततेची खरी कसोटी ठरणार आहे.**

# तेल दर घसरण भारताच्या पथ्यावर

जागतिक राजकारण आणि अर्थकारणात सध्या मोठ्या प्रमाणावर अस्थिरता निर्माण झाली असतानाही जागतिक तेल बाजारात मात्र अपेक्षेच्या विरुद्ध चित्र दिसत आहे. अमेरिका-इराण संघर्ष, रशिया-युक्रेन युद्ध, अमेरिकेने तेलसमृद्ध व्हेनेझुएलावर मिळवलेले नियंत्रण आणि इतर भू-राजकीय तणाव असूनही क्रूड ऑईलचे दर वाढण्याऐवजी सतत घसरत आहेत. सध्या क्रूड ऑईलचा दर प्रतिबॅरल 60 डॉलर्सच्या खाली आला असून, काही आंतरराष्ट्रीय विश्लेषकांच्या मते जून 2026 पर्यंत तो 50 डॉलर्सपर्यंत घसरण्याची शक्यता आहे.




हा दर महामारीच्या काळातील नीचांकी पातळीपेक्षाही कमी ठरू शकतो. इतिहास पाहता, युद्धजन्य परिस्थिती किंवा जागतिक मंदीच्या काळात नेहमीच तेलाचे दर भडकलेले दिसतात. 2008 च्या जागतिक आर्थिक मंदीच्या काळात क्रूड ऑईलचा दर प्रतिबॅरल 150 डॉलर्सपर्यंत पोहोचला होता.

तसेच 2022 मध्ये रशियाने युक्रेनवर आक्रमण केल्यानंतर ब्रेन्ट क्रूडचे दर 138 डॉलर्सपर्यंत गेले होते आणि नैसर्गिक वायूचे दरही प्रचंड वाढले होते. या दरवाढीचा मोठा फटका भारतासारख्या आयात-निर्भर देशांना बसला होता, कारण भारत आपल्या एकूण तेल गरजेपैकी सुमारे 90 टक्के तेल, 60 टक्के स्वयंपाकाचा गॅस आणि जवळपास 50 टक्के द्रवरूप नैसर्गिक वायू आयात करतो. मात्र सध्याची परिस्थिती भारतासाठी तुलनेने दिलासादायक ठरत आहे. भारताने आयातीसाठी निश्चित केलेल्या क्रूड ऑईल बास्केटचा सरासरी दर जानेवारी 2026 मध्ये 60 डॉलर्सपेक्षा कमी राहिला आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार 2021 नंतर ही सर्वात नीचांकी पातळी आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या संशोधक गटानेही पुढील काही महिन्यांत हा दर 50 डॉलर्सच्या खाली जाण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

त्यामुळे भारताच्या महागाई नियंत्रणाला, चालू खात्याच्या तुटीला आणि अर्थसंकल्पीय नियोजनाला मोठा दिलासा मिळत आहे. या घसरणीमागे प्रामुख्याने अमेरिकेचे धोरण कारणीभूत असल्याचे मानले जाते. रशिया-युक्रेन युद्धानंतर अमेरिकेने रशियन तेल खरेदी करणाऱ्या देशांवर कठोर निर्बंध आणि प्रचंड टॅरिफ लादले. परिणामी रशियन तेल कंपन्यांनी मोठ्या सवलतीत तेल विक्री सुरू केली. रोसनेफ्ट आणि ल्युकोईलसारख्या कंपन्यांनी सवलत प्रतिबॅरेल 7 डॉलर्सपेक्षा जास्त वाढवली असून भारतीय सार्वजनिक तेल कंपन्यांनी या सवलतीचा फायदा घेत रशियन तेलाची आयात वाढवली आहे. इंडियन ऑईलने डिसेंबर 2025 मध्ये उच्चांकी आयात नोंदवली होती. दुसरीकडे, अमेरिकन निर्बंधांमुळे रिलायन्ससारख्या खासगी कंपन्यांनी रशियन तेल खरेदी थांबवली आहे. यामुळे निर्बंध नसलेल्या छोट्या देशांना मध्यस्थ म्हणून महत्त्व प्राप्त झाले आहे.

तसेच गयाना, ब्राझील आणि अर्जेंटिनामधील नव्या तेल प्रकल्पांमुळे जागतिक पुरवठा वाढला असून त्यामुळे दरांवर दबाव आला आहे. एकूणच सध्याची परिस्थिती भारतासाठी फायदेशीर असली, तरी भविष्यातील खरी अनिश्चितता इराणभोवती केंद्रित आहे. इराण युद्धात ओढला गेला किंवा होर्मुझ सामुद्रधुनीत अडथळा निर्माण झाला, तर भारताकडे येणाऱ्या तेल व वायूच्या पुरवठ्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो.

इराणकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर अतिरिक्त टॅरिफ लावण्याची अमेरिकेची धमकीही भारतीय अर्थव्यवस्थेसाठी आव्हान ठरू शकते. त्यामुळे 2026 मधील जागतिक तेल बाजाराची दिशा अमेरिका-इराण संघर्षाच्या तीव्रतेवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहणार आहे.

## प्रासंगिक »

### मुंगी व कोशातला किडा

***एकदा एक मुंगी आपले खाद्य शोधत फिरत असता कोशातून नुकताच एक किडा बाहेर पडलेला तिला दिसला. कोशातून बाहेर पडलेले त्याचे पाय तो हळूहळू हालवीत होता. ते पाहून मुंगी म्हणाली,***

'अरेरे, काय ही तुझी स्थिती? या कोशात बंदीवान होऊन दिवस काढावे लागतात. तेव्हा तुझ्या व माझ्या स्थितीत फारच अंतर आहे असं म्हटले पाहिजे.' यावर किडा काहीच बोलला नाही. पुढे काही दिवसांनी ती मुंगी पुनः तेथे गेली असता त्या किड्याचे फक्त कवच मात्र तेथे पडले असून तो किडा कोठेतरी निघून गेला आहे असे तिला दिसते. ती इकडे तिकडे फिरत आहे तोच एक सुंदर पतंग आपल्या पंखांनी तिला वारा घालत असताना तिला दिसला. तो तिला म्हणाला, 'अग, त्या दिवशी बंदिवान म्हणून तू माझी कीव करीत होतीस, माझ्यापेक्षा तुझी स्वतःची स्थिती बरी असं म्हणत होतीस, तोच कोशातला किडा मी आहे हे लक्षात घे. आपल्याला वाटेल तिकडे फिरता येतं अशी बढाई मारायची असेल तर खुशाल मार. तोपर्यंत मी सहज थोडा आकाशात फिरून येतो.' इतके बोलून त्याने एक भरारी मारली व उंच आकाशात गेला.

तात्पर्य–संकटात असलेला माणूस पुनः कधीही वर डोके काढणार नाही अशा समजुतीने त्याचा उपहास करून त्याच्याजवळ स्वतःच्या वैभवाबद्दल बढाई मारणे हा मूर्खपणा होय.

राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निकालानंतर महापौर सोडत काढण्याची तयारी सुरू असतानाच राज्यात सर्वदूर घोडेबाजाराला उधाण आल्याचे दिसते. त्यामुळे कुणाचे किती नगरसेवक फुटणार, कोण कुणाशी युती करणार आणि कुणाचा कसा महापौर होणार, याबाबतच्या शक्याशक्यता तर्कापलीकडे जाऊन पोहोचल्या आहेत.

# महापालिकांमध्ये सत्ताकारणाचा उघड खेळ

राज्यातील महापालिका निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर राजकीय स्थैर्य निर्माण होण्याऐवजी सत्तेच्या वाटपासाठी घोडेबाजाराला उधाण आले आहे. भाजपने राज्यातील 9 महापालिकांवर निर्विवाद वर्चस्व मिळवले असून, एकूण 24 महापालिकांमध्ये मित्रपक्षांच्या मदतीने यश मिळवले आहे. मात्र अनेक महापालिकांमध्ये स्पष्ट बहुमत नसल्याने सत्तेची गणिते सतत बदलत आहेत. त्यामुळे फोडाफोडीचे राजकारण पुन्हा एकदा उघडपणे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर कल्याण–डोंबिवली महापालिकेतील घडामोडी विशेष लक्षवेधी ठरल्या आहेत. कल्याण–डोंबिवलीत शिंदे गटाला 53, भाजपला 50, ठाकरेसेनेला 11 आणि मनसेला 5 जागा मिळाल्या. सुरुवातीला भाजप आणि शिंदे गटाची युती असली तरी महापौरपद व सत्तावाटपावरून मतभेद वाढले. भाजपला महत्त्वाची पदे सोडण्यास शिंदे गट तयार नसल्याने संघर्ष तीव्र झाला. याच पार्श्वभूमीवर शिंदे गटाने मनसेला सोबत घेत भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.



याचवेळी ठाकरेसेनेचे चार नगरसेवक फुटल्याची माहिती समोर आल्याने या पक्षाला मोठा धक्का बसला आहे. मनसेकडून हा स्थानिक निर्णय असल्याचे सांगितले जात असले, तरी सत्तेसाठी कुणीही कुणासोबत जाण्याची तयारी असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. उल्हासनगरमध्येही असाच प्रकार पाहायला मिळाला. येथे भाजपचे 37 आणि शिंदे गटाचे 36 नगरसेवक निवडून आले असताना शिंदे गटाने वंचित बहुजन आघाडीच्या दोन नगरसेवकांना आपल्या बाजूला वळवले. फोडाफोडीच्या राजकारणाचा शिंदे यांना असलेला अनुभव या घडामोडीत दिसून येतो. ठाणे–कल्याण पट्ट्यात मजबूत पकड असलेल्या शिंदे गटाने भाजपच्या रणनीतीला प्रत्युत्तर दिल्याचेही बोलले जात आहे. मुंबई–ठाणे परिसरात ठाकरे बंधू एकत्र आल्याने मोठी अपेक्षा निर्माण झाली होती. मात्र निकालानंतर मनसेने शिंदे गटाची साथ दिल्याने सत्ताकारणाचे खरे स्वरूप समोर आले आहे. मनसेला निवडणुकीत फारसे यश न मिळाल्याने त्यांच्या बदलत्या भूमिकांवर प्रश्न उपस्थित होत आहेत. याचा परिणाम ठाकरे बंधूंच्या युतीवरही होऊ शकतो. मुंबई महानगरपालिकेत भाजप व शिंदे गटाची सत्ता असली तरी शिंदे गटाची मर्यादित ताकद पाहता दबावाचे राजकारण सुरू झाले आहे. इतर महापालिकांमध्येही अंतर्गत संघर्ष, संभाव्य युती आणि फोडाफोडीमुळे चित्र अस्थिर आहे. एकूणच सत्तेसाठी सुरू असलेला हा घोडेबाजार लोकशाहीसाठी धोकादायक असून, पक्षांतरविरोधी कायदा अधिक कडक करण्याची गरज अधोरेखित होत आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दांचीच शस्त्रे यत्न करीं ॥१॥

शब्दांचीच शेती शब्दांचीच माया ।
शब्दांमाजी पाया मोक्षाचा ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कुडाळच्या राजकीय रिंगणात सोमनाथ कदमांची 'एन्ट्री'

## प्रस्थापितांचे धाबे दणाणले; मोठमोठ्या पक्षांना तेच तेच चेहरे का सुचतात युवकांचा सवाल?

।सातारा । प्रतिनिधी। महाईन्यूज

**जावली तालुक्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या आणि प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या कुडाळ पंचायत समिती गण (क्र. ७३) मध्ये आज एका मोठ्या राजकीय भूकंपाचे संकेत मिळाले आहेत. प्रस्थापित पक्षांच्या 'घराणेशाही' आणि 'तेच तेच चेहरे' देण्याच्या वृत्तीला छेद देत, युवकांचे खंबीर समर्थक आणि कुडाळचे उपसरपंच सोमनाथ लक्ष्मण कदम यांनी आपला उमेदवारी अर्ज अधिकृतपणे दाखल केला आहे. त्यांच्या या अनपेक्षित एन्ट्रीमुळे तालुक्यातील राजकीय गणिते पूर्णपणे विस्कळीत झाली असून, प्रस्थापितांच्या गोटात चिंतेचे वातावरण पसरले आहे.**




### युवा नेतृत्वाचा एल्गार

"मोठमोठ्या राजकीय पक्षांना प्रत्येक वेळेस तेच तेच नेते का सुचतात? दुसऱ्यांना संधी कधी मिळणार?" असा संतप्त सवाल सध्या कुडाळमधील तरुण मतदारांमधून विचारला जात आहे. याच भावनेला वाट करून देण्यासाठी सोमनाथ कदम यांनी निवडणूक रिंगणात उडी घेतली आहे. आज मोजक्या पण कट्टर समर्थकांसह त्यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे आपला अर्ज सादर केला.

"नेहमी तेच चेहरे समोर ठेवून जनतेवर लादले जातात. सोमनाथ दादांसारखा सर्वसामान्यांत मिसळणारा आणि कामाचा अनुभव असलेला तरुण नेता रिंगणात उतरल्यामुळे आता खऱ्या अर्थाने बदलाची लाट येईल. आम्ही सर्व युवक त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत."

- महेश कदम, (युवा समर्थक)

"सोमनाथ कदम यांनी उपसरपंच म्हणून गावात उत्तम काम केले आहे. त्यांचा दांडगा जनसंपर्क हीच त्यांची मोठी शक्ती आहे. कुडाळ गणाच्या विकासासाठी एका नवीन विचाराच्या नेतृत्वाची गरज होती, ती आता पूर्ण होईल. ही निवडणूक चुरशीची ठरेल यात शंका नाही."

- संदीप पवार, (राजकीय विश्लेषक/कार्यकर्ते)

### विकासाच्या मुद्द्यावर ठाम

अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी बोलताना सोमनाथ कदम म्हणाले, "कुडाळ गणातील प्रलंबित विकासकामे मार्गी लावणे, स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि ग्रामीण भागातील प्रश्न सोडवणे हेच माझे मुख्य उद्दिष्ट आहे. जनतेच्या आग्रहाखातर आणि भागाच्या सर्वांगीण विकासासाठी मी हा निर्णय घेतला आहे."

### अदृश्य शक्ती'ची पंचक्रोशीत चर्चा

"मोठमोठ्या राजकीय पक्षांना प्रत्येक वेळेस तेच तेच नेते का सुचतात? दुसऱ्यांना संधी कधी मिळणार?" असा संतप्त सवाल सध्या कुडाळमधील तरुण मतदारांमधून विचारला जात आहे. याच भावनेला वाट करून देण्यासाठी सोमनाथ कदम यांनी निवडणूक रिंगणात उडी घेतली आहे. आज मोजक्या पण कट्टर समर्थकांसह त्यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे आपला अर्ज सादर केला.

# सांगली जिल्हा बँकेच्या शाखेतील चोरी; सव्वा तीन कोटींचा ऐवज हस्तगत, चौघांना अटक...



।सांगली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**जिल्हा बँकेच्या झरे (ता. आटपाडी) शाखेत धाडसी चोरी करून २२ लॉकर फोडून सोन्या-चांदीच्या दागिन्यांची चोरी करणारी टोळी सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने उघडकीस आणून चोरीस गेलेला सव्वा तीन कोटींचा ऐवज जप्त केला आहे.**



या प्रकरणी चौघांना अटक केल्याची माहिती पोलीस निरीक्षक संजीव झाडे यांनी बुधवारी सायंकाळी दिली.

याबाबत निरीक्षक झाडे यांनी सांगितले, झरे येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखेत दि. ७ जानेवारीच्या रात्री खिडकीचे गज कापून गॅस कटरने २२ लॉकर फोडून सोन्याचे व चांदीचे दागिने, देवांच्या मूर्तींची चोरी झाली होती. या प्रकरणी राहूल रंजमीश शर्मा (वय ३०, रा. ककराला, जि. बधायू उत्तर प्रदेश), विश्वजित विजय पाटील (वय २४, रा. बांबवडे, ता. पलूस), संकेत अरूण जाधव (वय २६, रा. बलवडी, ता. खानापूर) व इजाज राजू अत्तार (वय ३०, रा. आमणापूर) या चौघांना अटक करण्यात आली आहे.



संशयितांपैकी विश्वजित पाटील हा गलाई कामगार असून त्यांचे उत्तर प्रदेशातील शर्मा याच्याशी असलेल्या ओळखीने हा चोरीचा डाव रचला. पलूसमधील हॉटेलच्या खोलीमध्ये काही मंडळी वास्तव्यास होती अशी माहिती पोलीसांना मिळाली. त्यांना वास्तव्यासाठी स्थानिक लोकांनी मदत केल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे उत्तर प्रदेशातून शर्मा याला ताब्यात घेउन चौकशी केली असता अन्य संशयितांची माहिती समोर आली.

दरम्यान, यातील अन्य संशयित सांगलीवाडी येथे एका मोटारीतून आले असता त्यांना ताब्यात घेउन वाहनाची झडती घेतली असता वाहनात एक गावठी पिस्तुल, चार काडतुसे मिळाली. चोरीतील सोन्या-चांदीचे दागिने विक्रीसाठी आणल्याचे आढळले. त्यांच्याकडून व शर्मा याच्याकडून दागिने, चांदीच्या देवाच्या मूर्ती हस्तगत करण्यात आल्या.

बँकेच्या ग्राहकांनी लॉकरमध्ये ठेवलेल्या सोन्याचे दागिने वितळवून त्याची लगड करण्यात आली होती. हे सोने १ कोटी ५७ लाख ६८ हजार रूपयांचे असून त्याचे वजन १ किलो १६८ ग्रॅम आहे. तसेच ८७ लाखाचे चांदीचे दागिने, देवाचे मुखवटे, सोन्याचा मुलामा दिलेला कळस, हार, पैंजण, जोडवी, वाळे, गणेश मुर्ती, मुकुट, पंजे, घोडे, पाळणे आदी ऐवज आहे. तसेच ७० लाखाचे सोन्याचे दागिने, ५१ हजार ६०० रूपयांची रोकड असा ३ कोटी २५ लाख ५४ हजार ६०० रूपयांचा चोरीस गेलेला ऐवज जप्त करण्यात आला आहे.

चोरट्यांनी गॅसकटरचा वापर करून बँकेतील लॉकर तोडून ऐवज लंपास केला होता. तसेच आपला मागमूस लागू नये यासाठी बँकेत असलेल्या सीसीटीव्हीचा डी. व्ही. आर.ही सोबत नेला होता. यामुळे या चोरीचा तपास लावण्याचे काम आव्हानात्मक होते. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने अविरत शोध मोहिम राबवून ही चोरी उघडकीस आणून चोरीतील ऐवजही जप्त केला आहे.

# श्री जगन्नाथ मंदिरात बॉम्बस्फोट करण्याची धमकी

## राज्यसभेचे खासदार सुभासिस खुंटिया यांनाही जीवे मारण्याची धमकी

**। नवी दिल्ली । महाईन्यूज**

**ओडिशा राज्यातील प्रसिद्ध धार्मिक स्थळ पुरी येथील श्री जगन्नाथ मंदिर परिसरात बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी देण्यात आली आहे. बुधवारी (ता. २१) श्री जगन्नाथ मंदिर ग्रँड सेंटर मार्केटमध्ये बॉम्बस्फोट केला जाईल अशी धमकी आली आहे.**

सोशल मीडियावरील एका पोस्टमुळे पुरी पोलिसांची धावपळ झाली आहे. धमकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी श्री जगन्नाथ मंदिर परिसरासह पुरी शहरातील इतर संवेदनशील ठिकाणी सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे.



सोशल मीडियावर शेअर करण्यात आलेल्या या मेसेजमध्ये राज्यसभेचे खासदार सुभासिस खुंटिया यांना जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासात हा धमकीचा मेसेज ‘जुलिराणी पांडा’ नावाच्या फेसबूक खात्यावरून पोस्ट करण्यात आला आहे. पोलिसांनी सांगितले की, सोशल मीडियावर हा मेसेज कुणी टाकला याचा शोध सुरू आहे. तसेच आयपी एड्रेस शोधण्याचे काम सुरू आहे.

### मंदिर परिसराची सुरक्षा वाढवली

‘श्री जगन्नाथ मंदिरासह इतर संवेदनशील ठिकाणची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. मंदिर परिसरात स्पेशल टास्क युनिट (एसटीयू) आणि श्रीमंदिर सुरक्षा दलाचे जवान तैनात करण्यात आले आहेत. या धमकीचा तपास करण्यासाठी वरिष्ठ आणि अधिकाऱ्यांचे पथक नेमण्यात आले आहे’, अशी माहिती पुरीचे एसपी प्रतीक सिंग यांनी दिली.



### खासदारालाही धमकी

राज्यसभेचे खासदार खुंटिया यांनी सांगितले की, काही दिवसांपूर्वी त्यांना एका अज्ञात क्रमांकावरून १० लाख रुपयांची मागणी करणारा संदेश आला होता. पैसे न दिल्यास खासदारपदाचा राजीनामा देण्यास संदेश पाठवणाऱ्याने सांगितले होते. सुरुवातीला मी ती एक खोटी धमकी समजून त्याकडे दुर्लक्ष केले. आता फेसबुक खात्यावरून मला जीवे मारण्याची धमकी मिळाल्यानंतर मी आता हे प्रकरण गांभीर्याने घेतले आहे.

### धमकीची पोस्ट व्हायरल करणाऱ्याला अटक

धमकी प्रकरणाचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. पोलिसांनी मेटा कंपनीकडून संबंधित फेसबुक खात्याबाबत आणि ज्या ठिकाणाहून ही पोस्ट अपलोड केली गेली, त्या ठिकाणासह इतर माहिती मागवली आहे. तसेच ज्या व्यक्तीवर धमकीची पोस्ट व्हायरल केल्याचा आरोप आहे त्याला अटक करण्यात आली आहे. पोलिस त्याकडे तपास करत आहेत.

# वाहतुकीच्या नियमाचे उल्लंघन केल्यास लायसन्स रद्द होणार

**। नवी दिल्ली । महाईन्यूज**

**नव्या तरतुदीनुसार पाच वाहतुकीसंबंधीच्या गुन्ह्यांमध्ये हेलमेट न घालणे, सीट बेल्ट न लावणे, सिग्नल मोडणे या सारख्या तुलनेनं कमी तीव्रतेच्या गुन्ह्यांचा देखील समावेश करण्यात आला.**

आता सिग्नल तोडणं किंवा कोणतेही वाहतुकीचे नियम तोडणं चांगलंच महागात पडणार आहे.

जर एका वर्षात तुम्ही पाचवेळा वाहतुकीचे नियम मोडले तर तुमचा चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) तीन महिन्यासाठी रद्द होऊ शकतं. ही ड्रायव्हिंग लायसन्स रद्द करण्याची तरतूद दळणवळण मंत्रालयाच्या नवीन मोटर व्हेइकल सुधारणा नियमात करण्यात आल्याचे वृत्त आहे.



### कोणाला असणार अधिकार?

वाहन चालक परवाना संबंधीचे आरटीओ किंवा जिल्हा ट्रान्सपोर्ट ऑफिस यांना याबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले आहे. या नव्या तरतुदीनुसार आरटीओ किंवा जिल्हा ट्रान्सपोर्ट ऑफिसने चालकाचा परवाना रद्द करण्यापूर्वी परवाना धारकाची बाजू ऐकून घेतली पाहिजे. या नवीन नियमाचे नोटीफिकेशन बुधवारी काढण्यात आले आहे. पाच किंवा त्यापेक्षा जास्त वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यावर चालक परवाना रद्द करण्याच्या निर्णयाची अंमलबजावनी ही १ जानेवारीपासून लागू झाली आहे.

### आधी कधी लायसन्स होत होतं रद्द?

नवीन नोटिफिकेशननुसार एका वर्षापूर्वी मोडलेला वाहतुकीचा नियम किंवा गुन्हा हा पुढच्या वर्षी ग्राह्य धरता येणार नाही. सध्याच्या घडीला २४ असे नियम आहेत ज्यामुळे संबंधीत अधिकारी तुमचा वाहन परवाना रद्द करू शकतो. यात वाहन चोरी, प्रवाशावर हल्ला, प्रवाशाचे अपहरण. वेगाची मर्यादा ओलांडलणे, मर्यादेपेक्षा जास्त सामान गाडीत भरणे, सार्वजनिक ठिकाणी वाहन बेवारस स्थितीत सोडून जाणे या नियमांचा देखील समावेश आहे.

### नव्या कडक तरतुदी

नवीन नोटिफिकेशननुसार एका वर्षापूर्वी मोडलेला वाहतुकीचा नियम किंवा गुन्हा हा पुढच्या वर्षी ग्राह्य धरता येणार नाही. सध्याच्या घडीला २४ असे नियम आहेत ज्यामुळे संबंधीत अधिकारी तुमचा वाहन परवाना रद्द करू शकतो. यात वाहन चोरी, प्रवाशावर हल्ला, प्रवाशाचे अपहरण. वेगाची मर्यादा ओलांडलणे, मर्यादेपेक्षा जास्त सामान गाडीत भरणे, सार्वजनिक ठिकाणी वाहन बेवारस स्थितीत सोडून जाणे या नियमांचा देखील समावेश आहे.

### दिशा योग्य मात्र...

याबाबत बोलताना दिल्लीचे माजी सह वाहतूक संचालक अनिल चिक्का यांनी सांगितलं की वर्षात पाचवेळा वाहतुकीचे नियम मोडल्यावर वाहन परवाना रद्द ही तरतुद योग्य दिशेला जाणारी आहे. मात्र लोकं धोकादायक पद्धतीनं वाहन चालवतात हे ट्रॅफिक पोलिसांच्या नजरेत येत नाहीत त्याबाबत काय. याबाबत एसओपीचा अभाव आहे. तसेच सीसीटीव्हीत कैद झालेले वाहतुक उल्लंघनाची प्रकरणे ही अनेकवेळा न्यायालयात आव्हान दिले जाते.





## क्रितीने बालपणीच्या आठवणींना दिला उजाळा

अभिनेत्री क्रिती सनॉनची धाकटी बहीण नुपूर सनॉन हिचा विवाह सोहळा नुकताच पार पडला. आपल्या लाडक्या बहिणीला वधूच्या रुपात पाहून क्रिती प्रचंड भावूक झाली आहे. तिने सोशल मीडियावर लग्नाचे काही खास फोटो शेअर करत आपल्या मनातील भावनांना वाट करून दिली आहे. '५ वर्षांची असताना तिला पहिल्यांदा कडेवर घेतलं होतं...' आपल्या पोस्टमध्ये क्रितीने बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला आहे. तिने लिहिले की, "मी सध्या जे अनुभवत आहे, ते व्यक्त करण्यासाठी शब्द अपुरे पडतील. अजूनही माझा विश्वास बसत नाहीये की माझ्या छोट्या बहिणीचं लग्न झालं आहे! जेव्हा मी ५ वर्षांची होते, तेव्हा तिला पहिल्यांदा कडेवर घेतलं होतं. तिथून सुरू झालेला हा प्रवास तिला जगातील सर्वात सुंदर वधू म्हणून पाहण्यापर्यंत येऊन पोहोचला आहे, हे पाहून मन भरून आलंय." लग्नातील विधी आठवत क्रितीने पुढे लिहिले की, "तुम्हा दोघांना लग्नाचे वचन घेताना पाहणं हा माझ्या आयुष्यातील सर्वात भावूक आणि सुंदर क्षण होता. स्टेबिन, तुला माहित आहे की नुपूर माझी 'जान' आहे आणि मला खात्री आहे की ती तुझीही 'जान' आहे... अगदी आयुष्यभरासाठी!" बहीण सासरी गेल्याची रुखरुख व्यक्त करताना क्रितीने एक मजेशीर पण हळवी गोष्टही सांगितली. ती म्हणाली की, नुपूर आता फक्त २० मिनिटांच्या अंतरावर राहणार आहे आणि ती वारंवार घरी येत राहील, तरीही तिच्याशिवाय घर रिकामं वाटेल. पण नुपूर आता दोन घरांमध्ये आनंद पसरवेल, याचा आपल्याला सार्थ अभिमान असल्याचेही तिने नमूद केले. स्टेबिन बेन आता सनॉन कुटुंबाचा मुलगा नुपूरचा पती आणि प्रसिद्ध गायक स्टेबिन बेन याचे स्वागत करताना क्रितीने त्याला हक्काने 'भाऊ' मानले आहे. तिने म्हटले, "स्टेबिन, तू गेल्या ५ वर्षांहून अधिक काळापासून आमच्या कुटुंबाचा भाग आहेस. प्रत्येक सरत्या वर्षासोबत आपलं नातं अधिक घट्ट झालं आहे. 'आय लव्ह यू स्टेबू!' मला माहित आहे की मला आयुष्याभरासाठी एक हक्काचा भाऊ आणि मित्र मिळाला आहे." असं देखील अभिनेत्री म्हणाली आहे.



## राधिका आपटेची टीका

बॉलिवूडमध्ये कलाकारांना १५-१६ तास सतत काम करावे लागते, ही बाब आता नव्या वादाचे कारण ठरत आहे. अभिनेत्री दीपिका पादुकोणने यापूर्वी याविरोधात आवाज उठवला होता, ज्यासाठी तिला एका मोठ्या चित्रपटातून डच्चूही देण्यात आला होता. आता प्रसिद्ध अभिनेत्री राधिका आपटे हिने या प्रथेवर कडाडून टीका केली आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत राधिकाने कामाच्या तासांवरून सेटवर झालेल्या वादाचा थरार सांगितला. '१२ तासांत प्रवास आणि मेकअपही हवा' आई झाल्यानंतर कामावर परतलेल्या राधिकाने शूटिंगच्या तासांबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ती म्हणाली, "जर मला फिल्म इंडस्ट्रीत काही बदल करण्याची संधी मिळाली, तर मी सर्वात आधी कामाच्या तासांवर नियम आणेल.मी स्पष्टपणे सांगितले आहे की, मी १२ तासांपेक्षा जास्त काम करणार नाही. विशेष म्हणजे, या १२ तासांत माझा प्रवास, मेकअप आणि शूटिंग या सर्वांचा समावेश असायला हवा. जर मला प्रवासासाठी २ तास लागत असतील, तर त्यानुसारच शूटिंगचे नियोजन व्हायला हवे." जास्त वेळ काम करण्यास नकार दिल्याने सेटवर मोठा वाद झाल्याचेही तिने सांगितले. "आपल्या मुलांना आठवडाभर दूर ठेवून कोणी काम करावे, ही अपेक्षा ठेवणे चुकीचे आहे. जेव्हा मी शिफ्ट वाढवून देण्यास नकार दिला, तेव्हा निर्मात्यांशी माझे खटके उडाले." असं देखील तिने सांगितलं. सल्ला देणाऱ्यांना राधिकाचे चोख उत्तरसेटवर अनेकांनी राधिकाला सल्ला दिला की तिने मुलासाठी 'आया' (NANNY) ठेवावी किंवा मुलाला सेटवर घेऊन यावे. यावर संताप व्यक्त करत राधिका म्हणाली, "ज्यांनी मला हा सल्ला दिला त्यांना मी स्पष्ट शब्दांत सांगितले की, मला माफ करा, पण हा या समस्येवरचा उपाय नाही. ही माझी स्पष्ट भूमिका आहे आणि मी त्यावर ठाम आहे."

## साई पल्लवी बोल्ड कपडे का घालत नाही?



दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री साई पल्लवी त्यांच्या अभिनयासोबतच साधेपणा, नैसर्गिक सौंदर्य आणि पारंपरिक वेशभूषेसाठी ओळखल्या जातात. त्या क्वचितच बोल्ड किंवा ग्लॅमरस कपड्यांमध्ये दिसतात. यामागचं कारण त्यांनी स्वतः एका मुलाखतीत सांगितलं असून, ते त्यांच्या कॉलेजमधील एका कटू अनुभवाशी जोडलेलं आहे.कॉलेजमध्ये घडलेली ती घटना साई पल्लवी यांनी सांगितलं की कॉलेजच्या काळात त्यांनी एका डान्स कॉम्पिटिशनमध्ये भाग घेतला होता. हा डान्स टँगो प्रकारचा होता आणि त्यासाठी त्यांनी स्लिट असलेला, किंचित बोल्ड ड्रेस घातला होता. या डान्ससाठी त्यांनी खूप मेहनत घेतली होती. मात्र, स्पर्धेचा व्हिडीओ सोशल मीडियावर आल्यानंतर काही लोकांनी तो वारंवार थांबवून त्यांच्या कपड्यांवर आणि शरीरावर टिप्पणी करायला सुरुवात केली. त्यांच्या अभिनयाकडे किंवा नृत्याकडे लक्ष न देता, लोक फक्त बाह्य रूपावरच केंद्रित झाले. साई पल्लवीला बसला मानसिक धक्का या प्रकारामुळे साई पल्लवी यांना प्रचंड दुःख झालं. त्या म्हणाल्या, "मला असं वाटलं की लोक मला एका वस्तूसारखं पाहत आहेत. माझ्या नृत्याऐवजी माझ्या कपड्यांकडे लक्ष दिलं जात होतं." या घटनेचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला आणि त्याच क्षणापासून त्यांनी बोल्ड कपडे न घालण्याचा निर्णय घेतला. चित्रपटांमध्येही ठाम भूमिका या अनुभवामुळे साई पल्लवी पूर्णपणे बदलल्या. पुढे चित्रपटसृष्टीत आल्यावरही त्यांनी एक ठाम नियम केला छोटे कपडे, रिव्हीलिंग आउटफिट्स किंवा अतिग्लॅमरस लुक नको. त्यांचा ठाम विश्वास आहे की लोकांनी त्यांना त्यांच्या अभिनयासाठी आणि भूमिकांसाठी ओळखावं, शरीरसौंदर्यासाठी नव्हे. "मला ग्लॅमरपेक्षा साधेपणातून ओळख मिळावी असं वाटतं," असं त्या स्पष्टपणे सांगतात.

दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री साई पल्लवी त्यांच्या अभिनयासोबतच साधेपणा, नैसर्गिक सौंदर्य आणि पारंपरिक वेशभूषेसाठी ओळखल्या जातात. त्या क्वचितच बोल्ड किंवा ग्लॅमरस कपड्यांमध्ये दिसतात. यामागचं कारण त्यांनी स्वतः एका मुलाखतीत सांगितलं असून, ते त्यांच्या कॉलेजमधील एका कटू अनुभवाशी जोडलेलं आहे.कॉलेजमध्ये घडलेली ती घटना साई पल्लवी यांनी सांगितलं की कॉलेजच्या काळात त्यांनी एका डान्स कॉम्पिटिशनमध्ये भाग घेतला होता. हा डान्स टँगो प्रकारचा होता आणि त्यासाठी त्यांनी स्लिट असलेला, किंचित बोल्ड ड्रेस घातला होता. या डान्ससाठी त्यांनी खूप मेहनत घेतली होती. मात्र, स्पर्धेचा व्हिडीओ सोशल मीडियावर आल्यानंतर काही लोकांनी तो वारंवार थांबवून त्यांच्या कपड्यांवर आणि शरीरावर टिप्पणी करायला सुरुवात केली. त्यांच्या अभिनयाकडे किंवा नृत्याकडे लक्ष न देता, लोक फक्त बाह्य रूपावरच केंद्रित झाले. साई पल्लवीला बसला मानसिक धक्का या प्रकारामुळे साई पल्लवी यांना प्रचंड दुःख झालं. त्या म्हणाल्या, "मला असं वाटलं की लोक मला एका वस्तूसारखं पाहत आहेत. माझ्या नृत्याऐवजी माझ्या कपड्यांकडे लक्ष दिलं जात होतं." या घटनेचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला आणि त्याच क्षणापासून त्यांनी बोल्ड कपडे न घालण्याचा निर्णय घेतला.चित्रपटांमध्येही ठाम भूमिका या अनुभवामुळे साई पल्लवी पूर्णपणे बदलल्या. पुढे चित्रपटसृष्टीत आल्यावरही त्यांनी एक ठाम नियम केला छोटे कपडे, रिव्हीलिंग आउटफिट्स किंवा अतिग्लॅमरस लुक नको. त्यांचा ठाम विश्वास आहे की लोकांनी त्यांना त्यांच्या अभिनयासाठी आणि भूमिकांसाठी ओळखावं, शरीरसौंदर्यासाठी नव्हे. "मला ग्लॅमरपेक्षा साधेपणातून ओळख मिळावी असं वाटतं," असं त्या स्पष्टपणे सांगतात.

## पहिल्या चित्रपटात बिनलग्नाची आई झाली



'तेरे संग'मध्ये माहिका उर्फ माहीची भूमिका करणाऱ्या शीनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. गोंडस शीना प्रेक्षकांना फार आवडली होती. पण हा चित्रपट मात्र बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी करू शकला नाही. चित्रपट फ्लॉप झाल्यावर शीना दाक्षिणात्य इंडस्ट्रीकडे वळली. तिने दोन तेलुगू व एक कन्नड चित्रपट केला. पण तिथेही तिचं करिअर फार यशस्वी राहिलं नाही.

# भारताला नवा 'फिनिशर' गवसला

## पहिल्याच सामन्यात रिंकूची MS Dhoni च्या मोठ्या विक्रमाशी बरोबरी

**। दिल्ली । प्रतिनिधी ।**
**महाईन्यूज**

**भारतीय संघाचा माजी कर्णधार एमएस धोनी हा आपल्या स्फोटक फलंदाजीसाठी ओळखला जायचा. शेवटी फलंदाजीला येऊन तुफान फटकेबाजी करून तो संघाच्या विजयात मोलाचं योगदान द्यायचा.**

धोनीच्या निवृत्तीनंतर भारतीय संघाला असा फलंदाज मिळालेला नाही, जो शेवटी फलंदाजीला येऊन वेगाने धावा करेल. पण रिंकू सिंग ही जागा भरून काढण्यासाठी प्रबळ दावेदार आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या टी -२० सामन्यात फलंदाजी करताना त्याने शेवटी फलंदाजीला येऊन नाबाद ४४ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने एमएस धोनीच्या मोठ्या विक्रमाची बरोबरी केली आहे.



न्यूझीलंड विरुद्ध झालेल्या पहिल्या टी -२० सामन्यात भारतीय संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. डावाची सुरूवात करताना अभिषेक शर्माने तुफान फटकेबाजी करत ८४ धावा केल्या. तर शेवटी रिंकू सिंगने २० चेंडूत नाबाद ४४ धावांची खेळी केली. या खेळी दरम्यान त्याने ४ चौकार आणि ३ षटकार खेचले.

पाहिल्या डावातील शेवटच्या षटकात फलंदाजी करताना त्याने २ षटकार खेचले. यासह तो भारतीय संघाकडून २० व्या षटकात फलंदाजी करताना सर्वाधिक षटकार मारणाऱ्या फलंदाजांच्या यादीत संयुक्तरित्या दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे. या विक्रमात त्याने एमएस धोनीच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. रिंकू सिंगने आपल्या छोट्याशा टी -२० कारकिर्दीत २० व्या षटकात फलंदाजी करताना १२ षटकार खेचले आहेत. तर एमएस धोनीच्या नावे देखील १२ षटकार खेचण्याची नोंद आहे. या यादीत स्फोटक फलंदाज हार्दिक पंड्या अव्वल स्थानी आहे. हार्दिकच्या नावे २० व्या षटकात फलंदाजी करताना १५ षटकार मारण्याची नोंद आहे. मुख्य बाब म्हणजे रिंकू सिंगने केवळ ३७ चेंडूत १२ षटकार मारले आहेत. तर एमएस धोनीने १३२ चेंडूत १२ षटकार खेचले होते. अव्वल स्थानी असलेल्या हार्दिक पंड्याने ९९ चेंडूत १५ षटकार मारले होते.

### २० व्या षटकात सर्वाधिक षटकार मारणारे फलंदाज

हार्दिक पंड्या – १५ षटकार (९९ चेंडूत)
रिंकू सिंग – १२ षटकार (३८ चेंडूत)
एमएस धोनी – १२ षटकार (१३२ चेंडूत)
सूर्यकुमार यादव – ११ षटकार (२८ चेंडूत)



# भारताची स्टार खेळाडू पीव्ही सिंधूने रचला नवा विक्रम

**। प्रतिनिधी ।**
**महाईन्यूज**

**भारताची स्टार बॅटमिंटनपटू पीव्ही सिंधू सध्या इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरली आहे. या स्पर्धेतही तिच्याकडून दमदार खेळ पाहायला मिळाला आहे. स्पर्धेतील प्री क्वार्टर फायनल फेरीत तिने डेन्मार्कच्या लाईन होजमार्कचा पराभव करत स्पर्धेतील क्वार्टरफायनलमध्ये प्रवेश मिळवला आहे. तिने लाईन होजमार्कचा पराभव केला.**

पण याआधी झालेल्या सामन्यांमध्ये तिला संघर्ष करावा लागला होता. पहिला सामना जिंकण्यासाठी तिला चांगलाच जोर लावावा लागला. पण प्री क्वार्टर फायनलमध्ये मिळवलेला विजय तिच्यासाठी अतिशय खास ठरला. हा सामना जिंकून तिने असं काही करून दाखवलं आहे, जे याआधी कुठल्याही भारतीय महिला बॅडमिंटनपटूला करता आलं नव्हतं.



**असा पराक्रम करणारी ठरली पहिलीच भारतीय महिला बॅडमिंटनपटू**

या स्पर्धेतील प्री क्वार्टर फायनलमध्ये खेळताना सिंधूने लाईन होजमार्क कजेरफेल्डवर अवघ्या ४३ मिनिटात विजय मिळवला. या सामन्यात तिने लाईन होजमार्क कजेरफेल्डला पुनरागमन करण्याची संधीच दिली नाही. या सामन्यातील पहिला सेट तिने २१-१९ आणि दुसरा सेट २१-१८ च्या फरकाने जिंकून क्वार्टर फायनलमध्ये आपलं स्थान पक्क केलं. हा सामना ऐतिहासिक असण्यामागचं सर्वात मोठं कारण म्हणजे, हा तिच्या बॅडमिंटन कारकिर्दीतील महिला एकेरी प्रकारातील ५०० वा विजय ठरला.

महिला एकेरी प्रकारात ५०० सामने जिंकणारी पहिलीच भारतीय महिला बॅडमिंटनपटू ठरली आहे. याआधी कुठल्याही भारतीय महिला बॅडमिंटनपटूला असा पराक्रम करता आलेला नाही. तसेच असा पराक्रम करणारी ती जगातील सहावी महिला बॅडमिंटनपटू ठरली आहे. सिंधूने या स्पर्धेतील क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश केला आहे. या फेरीत तिचा सामना चीनच्या चेन यू फेईसोबत होणार आहे. दोन्ही दिग्गज खेळाडूंपैकी एक आहेत. दोन्ही खेळाडू आतापर्यंत १३ वेळेस आमनेसामने आले आहेत. यादरम्यान फेईने ७ सामन्यांमध्ये बाजी मारली आहे. तर सिंधूला ६ सामन्यांमध्ये विजय मिळवता आला आहे.

इंडोनेशिया मास्टर्स ५०० स्पर्धेत पीव्ही सिंधूसह लक्ष्य सेनने देखील पुरूषांच्या कॅटेगरीत सहभाग घेतला आहे. लक्ष्यने देखील या स्पर्धेतील क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश केला आहे. लक्ष्यने प्री क्वार्टर फायनलमध्ये हाँगकाँगच्या जेसन गुनावनवर २१-१० आणि २१-११ च्या फरकाने विजय मिळवला आहे.लक्ष्यचा क्वार्टर फायनल फेरीतील सामना थायलंडच्या पक्कापोनसोबत होणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। शुक्रवार ।
दि. 23 जानेवारी 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## विद्यार्थ्यांना आर.आर.आर. सेंटर संकल्पनेचे प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन

# महापालिकेच्या आरोग्य विभागाचा उपक्रम

। पिंपरी । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने चिंचवड येथील जिजाऊ पर्यटन केंद्र येथे विद्यार्थ्यांना कचऱ्याचा कमी वापर, पुनर्वापर, पुनर्चक्रीकरण या तत्त्वांवर आधारित महापालिकेच्या अभिनव आर.आर.आर. सेंटर संकल्पनेची सविस्तर माहिती देण्यात आली.**





> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आर.आर.आर. केंद्राच्या माध्यमातून कमी वापर, पुनर्वापर व पुनर्चक्रीकरण या संकल्पनांच्या आधारे शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण केला जात आहे. अशा अभिनव व कल्पक उपक्रमांमुळे शहर अधिक स्वच्छ, सुंदर व हरित होण्यास निश्चितच मदत होईल.
> **- डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**




कचरा निर्मिती कमी करण्यासाठी दैनंदिन जीवनात कोणत्या सवयी अंगीकाराव्यात, वापरलेल्या वस्तूंचा पुनर्वापर कसा करता येईल, तसेच पर्यावरण संरक्षणात प्रत्येक नागरिकाची भूमिका किती महत्त्वाची आहे, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक बनविण्याच्या उद्देशाने महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर व अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल व सहाय्यक आयुक्त अमित पंडित यांच्या



अधिपत्याखाली आरोग्य विभाग सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. या अंतर्गत 'ब' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक १७ मधील जिजाऊ पर्यटन केंद्र, चिंचवड येथे स्वच्छ सर्वेक्षण २०२६ तसेच माझी वसुंधरा ६.० अभियानाच्या अनुषंगाने स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी केंद्र शासनाच्या "स्वच्छ आदत से स्वच्छ भारत" या उपक्रमांतर्गत ओला व सुका कचरा विलगीकरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. ओल्या कचऱ्यासाठी हिरव्या रंगाच्या डब्याचा व सुक्या कचऱ्यासाठी निळ्या रंगाच्या डब्याचा वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिकाद्वारे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच कचरा रस्त्यावर अथवा सार्वजनिक ठिकाणी न टाकणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये, सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळणे, सार्वजनिक शौचालयांचा योग्य वापर करणे तसेच "फ्लश करा, हात स्वच्छ ठेवा" या स्वच्छतेच्या सवयींबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. या उपक्रमात विद्यार्थी देखील बहुसंख्येने उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

# राष्ट्रीय युवा शेफ स्पर्धेत MSIHMCT देशात उपविजेते

## केंद्रीय पर्यटन व सांस्कृतिक मंत्री श्री. गजेंद्र सिंग शेखावत यांच्याकडून कौतुक

**। नवी दिल्ली । महाईन्यूज**

**महाराष्ट्र राज्य हॉटेल मॅनेजमेंट आणि केटरिंग टेक्नॉलॉजी संस्था (MSIHMCT), पुणे येथील विद्यार्थ्यांनी PHDCCI नॅशनल यंग शेफ स्पर्धा २०२५–२६ च्या ग्रँड फिनालेमध्ये उपविजेतेपद पटकावून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.**








ही प्रतिष्ठेची स्पर्धा इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, कॅटरिंग अँड न्यूट्रिशन (IHM), पुसा, नवी दिल्ली येथे पार पडली.

देशभरातील नामांकित हॉटेल मॅनेजमेंट संस्थांच्या सहभागातून झालेल्या या स्पर्धेत MSIHMCT चे तृतीय वर्षाचे विद्यार्थी कु. आर्या कामत आणि श्री. महेश घुले यांनी अस्सल महाराष्ट्रीयन पाककलेचे नाविन्यपूर्ण सादरीकरण करून परीक्षकांची मने जिंकली. त्यांच्या मेनूमध्ये वऱ्हाडी, कोकणी, खान्देशी तसेच महाराष्ट्रातील विविध प्रादेशिक खाद्यसंस्कृतींचे स्वाद पारंपरिकतेसोबत आधुनिक शैलीत प्रभावीपणे मांडण्यात आले होते. पुरस्कार वितरण समारंभास माननीय केंद्रीय पर्यटन व सांस्कृतिक मंत्री श्री. गजेंद्र सिंग शेखावत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्याचे आणि सर्जनशीलतेचे विशेष कौतुक केले. या स्पर्धेचे मूल्यमापन नामवंत परीक्षक मंडळाने केले. यामध्ये शेफ मंजीत गिल, शेफ अनिल ग्रोवर, शेफ नंदलाल शर्मा, शेफ देबजीत मजुमदार, शेफ नितीन शेंडे आणि शेफ श्रीनिवास वेंकटेशन यांचा समावेश होता.

या यशामागे संस्थेच्या प्राचार्य डॉ. सीमा झगडे, शेफ पूजा पवार तसेच प्रा. देवेश जानवेकर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. विद्यार्थ्यांमध्ये पाककौशल्य, सर्जनशील सादरीकरण आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित व्हावी, या उद्देशाने या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना केंद्रीय पर्यटन व सांस्कृतिक मंत्री श्री. गजेंद्र सिंग शेखावत म्हणाले की, “भारतीय पाककला ही देशाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा असून पर्यटन विकासाचा एक महत्त्वाचा आधार आहे. पारंपरिक ज्ञानावर आधारित पौष्टिक अन्ननिर्मितीत नवोन्मेष करण्याची मोठी संधी युवा शेफसमोर असून अशा स्पर्धांमुळे जागतिक स्तरावर भारतीय पाककलेची ओळख अधिक मजबूत होते.”प्राचार्य डॉ. सीमा झगडे यांनी सांगितले की, “अशा राष्ट्रीय स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती वाढीस लागते तसेच त्यांचे व्यावसायिक कौशल्य अधिक विकसित होते. भविष्यातही MSIHMCT अशा स्पर्धांमध्ये अग्रस्थानी राहील. या यशामुळे संस्थेचा नावलौकिक राष्ट्रीय पातळीवर अधिक दृढ झाला आहे.”

# प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी मेटाबॉलिक सिंड्रोम विषयावर वैद्यकीय तपासणी

**। पिंपरी । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे “किशोरवयीन मुलांमधील मेटाबॉलिक सिंड्रोम : लवकर निदान व सर्वसमावेशक हस्तक्षेप” या विषयावर विशेष वैद्यकीय आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शास्त्रशुद्ध पद्धतीने रचलेल्या तपासणीत इयत्ता ७ वी ते ११ वी मधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त आणि सक्रिय सहभाग नोंदवला.**



या उपक्रमाचा मुख्य उद्देश किशोरवयीन मुलांमधील मेटाबॉलिक जोखमींची लवकर ओळख करून भविष्यात उद्भवणारे जीवनशैलीजन्य आजार टाळण्यासाठी वेळेवर व योग्य हस्तक्षेप करणे हा होता. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या अनुभवी वैद्यकीय पथकाने विद्यार्थ्यांची सविस्तर वैद्यकीय, शारीरिक (अँथ्रोपोमेट्रिक) तसेच मेटाबॉलिक तपासणी केली.

तपासणीदरम्यान विद्यार्थ्यांची शरीररचना, उंची-वजन, रक्तदाब तसेच विविध मेटाबॉलिक निर्देशांक अत्यंत काळजीपूर्वक तपासण्यात आले. यासोबतच विद्यार्थ्यांना आरोग्यदायी आहार, नियमित शारीरिक व्यायाम आणि संतुलित जीवनशैलीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि दीर्घकालीन आरोग्य संवर्धनाच्या उपायांवर विशेष भर देण्यात आला.

या उपक्रमाबद्दल पालक व शिक्षकांनी विद्यापीठाच्या पुढाकारात्मक आणि समाजोपयोगी दृष्टिकोनाचे मनापासून कौतुक केले. शाळा व्यवस्थापनाने डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या वैद्यकीय पथकाचे त्यांच्या मोलाच्या योगदानाबद्दल मनःपूर्वक आभार मानले.

अशा उपक्रमांमुळे प्रियदर्शनी स्कूलची विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाप्रती असलेली ठाम बांधिलकी अधोरेखित होते. कार्यक्रमाचा समारोप विद्यार्थ्यांना आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारण्यासाठी प्रेरित करणाऱ्या संवादात्मक सत्राने झाला. या संपूर्ण उपक्रमाचे शाळेचे व्यवस्थापन ट्रस्टी, प्राचार्य तसेच संपूर्ण शिक्षक व कर्मचारी वर्गाने भरभरून कौतुक केले.

# MSIHMCT Students Emerge as National Runners-up at National Young Chef Competition

## Special Appreciation from Union Minister for Tourism and Culture Shri Gajendra Singh Shekhawat




**Pune : STUDENTS OF THE MAHARASHTRA STATE INSTITUTE OF HOTEL MANAGEMENT AND CATERING TECHNOLOGY (MSIHMCT), PUNE, HAVE BROUGHT LAURELS TO THE INSTITUTE BY SECURING THE RUNNER-UP POSITION AT THE NATIONAL LEVEL IN THE PHDCCI NATIONAL YOUNG CHEF COMPETITION 2025–26. THE GRAND FINALE OF THIS PRESTIGIOUS COMPETITION WAS HELD AT THE INSTITUTE OF HOTEL MANAGEMENT, CATERING & NUTRITION (IHM), PUSA, NEW DELHI.**







Amid participation from leading hotel management institutes across the country, third-year MSIHMCT students Ms. Arya Kamat and Mr. Mahesh Ghule impressed the jury with their innovative presentation of authentic Maharashtrian cuisine. Their menu showcased the rich culinary diversity of Maharashtra—including Varhadi, Konkan, Khandeshi and other regional food traditions—blending traditional flavours with contemporary culinary techniques.

The prize distribution ceremony was graced by the Honourable Union Minister for Tourism and Culture, Shri Gajendra Singh Shekhawat, as the chief guest. On this occasion, he specially commended the students for their culinary skills, creativity, and commitment to preserving India's gastronomic heritage.



The competition was evaluated by a distinguished panel of judges comprising Chef Manjit Gill, Chef Anil Grover, Chef Nandlal Sharma, Chef Debjit Majumdar, Chef Nitin Shende, and Chef Srinivas Venkatesh.

The achievement was made possible through the dedicated guidance and mentorship of Principal Dr. Seema Zagade, Chef Pooja Pawar, and Prof. Devesh Janvekar, whose support played a crucial role in the students' success.

The national-level competition was organised with the objective of nurturing culinary excellence, creative presentation, and a competitive spirit among young chefs across the country.

Addressing the gathering, Union Minister Shri Gajendra Singh Shekhawat stated, "Indian cuisine is a rich cultural heritage of the nation and an important pillar of tourism development.

Young chefs have immense opportunities to innovate in nutritious food rooted in traditional knowledge. Competitions such as these help strengthen the global identity of Indian cuisine."




Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046